MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

Peer Reviewed International Refereed Research Journal

# VIDYAWARTA®

SPECIAL ISSUE January 2019

Maratha Vidya Prasarak Samaj's

## ARTS AND COMMERCE COLLEGE, KHEDGAON

Tal.Dindori, Dist.Nashik - 422 205

TWO DAYS NATIONAL SEMINAR ON

# "Economic and Political Influence of Asian Countries : India & China

Dated : 18th and 19th January, 2019



Guest Editor
Dr.D.N.Kare

Sponsored by
BCUD,
Savitribai Phule Pune University, Pune

Organized by
Department of Economics & Politics

MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318
Peer Reviewed International Refereed Research Journal
VIDYAWARTA®
SPECIAL ISSUE January 2019

# Special Issue :
# Economic and Political Influence of Asian Countries : India & China

UGC Approved Journal No. 41012
January, 2019

**Chief Editor**
**Mr. Bapuji Gholap**
Harshwardhan Publication Pvt. Ltd.
At Post Limbaganesh,
Tal. & Dist. Beed-431 126

**Guest Editor**
**Dr. D. N. Kare**
**Principal**
MVP Samaj's
Arts and Commerce College, Khedgaon,
Tal. Dindori, Dist. Nashik

**Executive Editor**
**Prof. Smt. Y.B.Garud**
MVP Samaj's
Arts and Commerce College,
Khedgaon,
Tal. Dindori, Dist. Nashik

MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

Peer Reviewed International Refereed Research Journal

VIDYAWARTA®

SPECIAL ISSUE January 2019

PEER REVIEWED INTERNATIONAL REFERRED RESEARCH JOURNAL
Impact Factor : 5.234
Special Issue : Economic and Political Influence of Asian Countries : India & China
UGC Approved Journal No.41012

ISSN : 2319-9318
January 2019

## Chief Editor

**Mr. Bapuji Gholap**
Harshwardhan Publication Pvt. Ltd.
At Post Limbaganesh,
Tal. & Dist. Beed-431 126

## Guest Editor

**Dr. D. N. Kare**
**Principal**
MVP Samaj's
Arts and Commerce College,
Khedgaon,
Tal. Dindori, Dist. Nashik

## Executive Editor

**Prof. Smt. Y.B.Garud**
MVP Samaj's
Arts and Commerce College,
Khedgaon,
Tal. Dindori, Dist. Nashik

## Editorial Committee

- Prof. Dr. Smt. S.S. Patil
- Prof. R.V.Ghumare
- Prof. A.B.Derle
- Prof. P. S. Gangurde
- Dr. D.S.Gadakh
- Prof. A.K.Bachute
- Prof. N.V.Nikam
- Prof. V.S.Jadhav

## Advisory Committee

- Dr. Sunil P. Ugale
- Dr. D.M.Limbole
- Dr. A.A.Gaikwad
- Dr. H.M.Kshirsagar
- Prof. S.D.Marathe
- Prof. S.B.Lokhande
- Prof. S.S.Kawale

Our Editors have reviewed paper with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers.

**Executive Editor**

PEER REVIEWED INTERNATIONAL REFERRED RESEARCH JOURNAL
Impact Factor : 5.234
Special Issue : Economic and Political Influence of Asian Countries : India & China
UGC Approved Journal No.41012

ISSN : 2319-9318
January 2019

# INDEX


| Sr. No. | Topic | Researcher | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | भारत-चीन परराष्ट्रीय धोरण वाटचाल | प्रा.अभिनव संपत पोटे | 1 |
| 2 | भारत चीनचा तुलनात्मक आढावा | प्रा.डॉ.सुनली प. उगले | 5 |
| 3 | चीन आणि सार्क देश | प्रा.डी.डी.ठाकरे | 16 |
| 4 | भारत व असियान संघटना | डॉ.डी.एन.कारे | 24 |
| 5 | भारताच्या दृष्टीने हिंदी महासागराचे सामरिक महत्त्व आणि चीनची भूमिका | प्रा.भिमराज गायकवाड | 29 |
| 6 | सीमावादाचे भारत व चीनवरील परिणाम | प्रा.जे.एल.पगारे | 33 |
| 7 | भारत आणि चीन आशियाई देशावर आर्थिक आणि राजकीय प्रभाव | प्रा.जगताप संदीप शांताराम | 38 |
| 8 | भारत चीन संबंध | प्रा.डॉ.पंकज निकम<br>प्रा.डॉ.मनोज जगताप | 42 |
| 9 | भारत - चीन संबंध | डॉ.व्ही.डी.कापडी<br>प्रा.सतीश सुभाष कावळे | 46 |
| 10 | भारत चीन संबंधाचे बदलते पैलू | डॉ.लिंबोळे गणेश मनोहर | 52 |
| 11 | भारत व चीन आर्थिक व राजकीय संबंध | डॉ.मनिषा के. आहेर | 55 |
| 12 | भारत आणि चीनची आशियातील भूमिका | प्रा.संजय अ. मराठे | 59 |
| 13 | भारत चीन संबंध | कु.निकिता लक्ष्मण गांगुर्डे | 67 |
| 14 | भारत आणि चीन यांच्यातील तुलना आणि आव्हाने | डॉ.अमोल ए. गायकवाड<br>प्रा.डॉ.एच.एम.क्षीरसागर | 70 |
| 15 | सार्कची कार्यप्रणाली व इतर देश | प्रा.कृष्णा रावा पाडवी | 75 |
| 16 | चीन संबंधाचे बदलते स्वरूप आणि दक्षिण आशिया | प्रा.राजेंद्र विश्वनाथ पवार | 81 |
| 17 | दक्षिण आशियातील भारत आणि चीन देशातील अर्थव्यवस्था | डॉ.डी.डी.वाळके | 86 |
| 18 | भारतीय अर्थव्यवस्था व चीनची अर्थव्यवस्था: एक अभ्यास | प्रा.डॉ.गोरक्षनाथ रामदास पिंगळे | 93 |
| 19 | भारत आणि चीनची आशियामधील भूमिका | प्रा.अरूण अंबादास पोटे | 99 |
| 20 | डोकलाम समस्या आणि भारत चीन संबंध | प्रा.पी.डी.गोणारकर | 105 |
| 21 | हिंदी महासागराचे भूराजकारण आणि चीनची उपस्थिती | प्रा.श्रीमती सुवर्णा पी. धामणे | 110 |
| 22 | भारत-चीन संबंध | प्रा.आर.जे.निकम | 116 |
| 23 | भारत आणि चीन : आशिया देशावरील प्रभाव | प्रा.शशिकांत एस. सांगळे | 120 |
| 24 | भारत चीन सीमा वाद | कु.स्वाती लक्ष्मण भोईटे | 124 |

ISSN : 2319-9318
January 2019


| Sr. No. | Topic | Researcher | Page No. |
|---|---|---|---|
| 25 | भारत आणि चीन संबंध : एक परामर्श | डॉ.एस.व्ही. टिळे | 127 |
| 26 | आशियाई देशांमधील आर्थिक व राजकीय वळण : एक दृष्टीक्षेप | डॉ.बी.सी.आहेर | 132 |
| 27 | भारत-चीन सीमा प्रश्न व संघर्षाचा आढावा | सौ.हर्षदा मंदार जोशी | 135 |
| 28 | जागतीकीकरणानंतरचे भारत चीन संबंध | प्रा.पंकजकुमार सुरेश गांगुर्डे | 139 |
| 29 | भारत चीनमधील सीमावादाचे स्वरूप आणि प्रभाव | प्रा.डॉ.पाटील सोनाली एस.<br>प्रा.डॉ.आहिरे के.म. | 141 |
| 30 | चीन आणि सार्क राष्ट्र | प्रा.राजू सानप | 145 |
| 31 | भारत आणि चीन राजनितिक संबंध | कु.तांबडे सागर शांताराम | 147 |
| 32 | भारत व चीन संबंध | कु.बोंबले कांचन गोरक्षनाथ | 149 |
| 33 | Role of India and China in Asia | Prin. Dr.D.R.Bachhav | 153 |
| 34 | The Role of India and China in South Asia | Dr.Sudhakar Pagar K. | 155 |
| 35 | Economic and Political Influence of India & China in Asian Country | Dr.A.H. Saoudager<br>Dr.R.A.Bhamre | 158 |
| 36 | A Clandestine Approach Towards Development : A Comparative Study of India and China | Dr.S.Y.Patil | 161 |
| 37 | Dumping Strategy of Chaina against India | Smt.Dr. J.D.Pawar<br>Prof. D.B.Male | 169 |
| 38 | Economic and Political Issues of India and China in south Asia | Dr.Kapadi A.S. | 171 |
| 39 | India and China – Strategic Implications of the Trade Deficit | Dr.A.D.Sonawane<br>Prof. Yogesh L. Bharaskar | 174 |
| 40 | Role of India and China in Asia | Prof. Jyoti Runja Bhor | 178 |
| 41 | India-China Bilateral Relations: Aspect and Conciliation | Dr.Dinkar Pandit Bhadane | 180 |
| 42 | India China Trade Relations: Overview | Prof. Vinayak T. Khatale | 184 |
| 43 | India and China Trade Relation | Dr.Y.B.Chavan | 187 |
| 44 | China and SAARC Countries | Prof.Smt. Anita B. Derle | 188 |
| 45 | Regional Development of South Asia : An evaluation of SAARC | Dr.Kadam Asha Dadasaheb | 192 |
| 46 | Role of India and China in Asia | Prof. H. R. Netare<br>Prof. U.B.Deshmukh | 196 |
| 47 | SAARC : Challenges and Prospectus | Dr.Yogesh H. Walunj | 200 |
| 48 | China and SAARC Countries | Mr.Raviraj A. Vatne | 203 |
| 49 | भारत व चीन संबंध | प्रा.योगिता बा. गरूड | 207 |
| 50 | भारत व चीन संबंध : समस्या व भवितव्य | प्रा.एस.बी.लोखंडे | 210 |
| 51 | भारतचीन संबंधाचे बदलते पैलू | प्रा.एस.जी.गांगुर्डे | 214 |

PEER REVIEWED INTERNATIONAL REFERRED RESEARCH JOURNAL
Impact Factor : 5.234
Special Issue : Economic and Political Influence of Asian Countries : India & China
UGC Approved Journal No.41012
ISSN : 2319-9318
January 2019

# "सार्कची कार्यप्रणाली व इतर देश"

प्रा. कृष्णा रावा पाडवी
अर्थशास्त्र विभाग
कर्मवीर आबासाहेब तथा ना.म. सोनवणे,
कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सटाणा, ता.बागलाण जि. नाशिक.
मो.नं ०९९२२९९९२५५
Email Id : krishnarawapadvi5555@gmail.com

**प्रास्ताविक (Introduction) :**

दक्षिण आशियायी देशांची प्रादेशिक सहकार्य संघटना– सार्क (South Asian Association for Regional Co-operation(SAARC)/ प्रादेशिक सहकार्यासाठी दक्षिण आशियाई सहकार्य संघटना (सार्क) /दक्षिण आशियाई विभागीय सहकार्य संघटना (सार्क) /दक्षिण आशियाई प्रादेशिक सहकार्य संघटना/

प्रादेशिक सहकार्यासाठी दक्षिण आशियाई संघटना (सार्क)(South Asian Association for Regional Co-operation(SAARC)

८ डिसेंबर,१९८५ रोजी दक्षिण आशियाई प्रादेशिक सहकार्य संघटनेची स्थापना झाली. या संघटेनत सात देश कायमस्वरुपी सदस्य आहेत. भारत, बांगला देश, पाकिस्तान, नेपाळ, श्रीलंका, भूतान आणि मालदिव या देशांचा समावेश होतो. या संघटनेचे मुख्य कार्यालय नेपाळची राजधानी काठमांडू येथे आहे. 'सार्क'चे मुख्य ध्येय मानवी आणि भौतिक साधनसंपत्तीचा अधिकाधिक उपयोग करुन सामाजिक आणि आर्थिक विकास साध्य करणे. नुकताच अफगाणिस्तानला सार्कचा आठवा सदस्य बनविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

**शोधनिबंधाची उद्दिष्टये**

१. सार्कच्या कार्यप्रणालीच्या आढावा घेणे.

२ सार्कच्या इतर देशांशी असलेल्या संबंधांचा अभ्यास करणे.

**संशोधन पध्दती**

प्रस्तुत शोध निबंधासाठी दुय्यम साधन सामग्रीचा वापर करण्यात आलेला आहे. उदा. विविध संदर्भ पुस्तके, क्रमिक पुस्तके, वर्तमानपत्रे, मासिके, विविध लेख, विविध संकेत स्थळे इत्यादीच्या संशोधनासाठी वापर केलेला आहे.

**सार्कची उद्विष्टे**

सार्क संघटनेच्या चार्टर कलम I मध्ये पुढील उद्दिष्टे दिली आहेत.

१. दक्षिण आशियातील लोकांच्या सामजिक,आर्थिक कल्याणत सुधारणा करणे आणि त्यांच्या जीवनमानाचा दर्जा सुधारणे.

ISSN : 2319-9318
January 2019

२. आर्थिक वाढीचा वेग वाढविणे,प्रदेशांतील समाजिक प्रगती आणि सांस्कृतिक विकास साधणे, सर्व व्यक्तींना आत्सन्मानाने जगण्याची संधी देणे आणि त्याच्या क्षमतेचा पूर्णपणे उपयोंग करुन घेणे.
३. दक्षिण आशियातींल देशांमध्ये सामुदायिकरीत्या आत्मनिर्भरता वाढवून ती बळकट करणे.
४. एकमेकांच्या समस्या समजावून घेऊन एकमेकांवरील विश्वास वाढविणे.
५. सभासद देशांच्या विकासाचा वेग वाढविण्यासाठी एकमेकांतील आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक,तांत्रिक आणि विज्ञान क्षेत्रांतील सहाकार्य वाढविणे.
६. समान हितसंबधी प्रश्नांवर आंतरराष्ट्रीय मंचावर आपापसांतील सहकार्य वाढविणे.
७. समान उद्दिष्टे आणि हेतू असलेल्या आंतरराष्ट्रीय आणि प्रादेशिक संघटनेबरोबर सहकार्य करणे.
८. इतर विकसनशील देशांबरोबर सहकार्य वाढविणे.
९. दक्षिण आशियाई लोकांच्या कल्याणात वाढ करणे.
१०. दहशतवादाचा सामुदायिकरीत्या मुकाबला करणे.

सार्कची कार्य :

सार्कची कार्ये पुढीलप्रमाणे सांगता येतात.

१. दक्षिण आशियाई देशांत विभागीय सहकार्य वाढविणे.
२. सदस्य देशांतील मतभेद दूर करण्याचा प्रयत्न करणे. तसेच चर्चेद्वारे मतभेद दूर करणे.
३. सार्कच्या सदस्य देशांमध्ये आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक मूल्यांची देवाणघेवाण करणे.
४. सार्कच्या सदस्य देशांत व्यापाराला चालना देणे आणि व्यापारात वाढ करणे.
५. सार्क देशांतील नैसर्गिक सानसामग्री, मनुष्यबळ आणि कौशल्याचा जास्तीतजास्त वापर करणे व सहकार्यातून विकास साधणे.
६. दक्षिण आशियाई देशांतील दारिद्र्य,उपासमार, रोगराई, निरक्षरता यांचे निर्मूलन करणे, तसेच पर्यावरणाचे संवर्धन करणे.
७. दक्षिण आशियाई देशांच्या सांस्कृतिक व ऐतिहासिक परंपरांचा सांभाळ करणे.
८. दक्षिण आशियाई देशांमध्ये तांत्रिक सहकार्य वाढीस लावणे.
९. सार्कचे सदस्य देश व इतर संघटना यांच्यात विचारांची देवाण–घेवाण वाढविणे.
१०. प्रादेशिक सहकार्यासाठी सक्षम क्षेत्रे निर्माण करणे.

ISSN : 2319-9318
January 2019

सार्कचे संघटन स्वरुप

१) 'उच्च धोरण

'सार्क'च्या कार्यकारी मंडळाने 'उच्च धोरण' ठरविले आहे. त्यानुसार सभासद देशांच्या सरकारचा प्रमुख्य घटनेनुसार कार्यकारी मंडळावर असतो. कार्यकारी मंडळाची बैठक दोन वर्षातून एकदा होते. विदेश व्यवहारमंत्री या समितीचे सभासद असतात: विदेश व्यापार सचिवांची स्थायी समिती असते.

ही समिती मागील कार्याचा आढावा घेऊन नवीन योजना मंजूर करुन त्याची कार्यवाही करते: स्थायी समितीचे मुख्य कार्य म्हणजे उदा.

१. सल्लामसलत आणि सहकार्यविषयक कार्यक्रम राबविणे.
२. आजूबाजूच्या प्रदेशांत सहकार्य निर्माण करणे.
३. आंतरक्षेत्रियांना प्राधान्य देणे.
४. चलनविषयक अद्ययावतता ठेवणे.
५. स्थायी समिती गरज असेल तेव्हा कार्यकारी मंडळाच्या मंत्र्यांना अहवाल साद करते. त्याचा मुख्य हेतू अंमलबजावणी हा असतो. स्थायी समिती अंमलबजावणीसाठी एक समिती तयार करते. या कार्यक्रम समितीला स्थायी समिती मदत करते.

ह्या समितीत सभासद सरकारचे वरिष्ठ अधिकारी असतात. कार्यक्रम समिती (Programme Committee) चे कार्य पुढीलप्रमाणे असते.

१. सचिवाच्या अंदाजपत्रकाची छाननी करणे.
२. सचिवांचरूा वार्षिक अनुसूचीचे अंतिम स्वरुप तयार करणे.
३. स्थायी समितीला चालू उपक्रम नेमून देणे.
४. तंत्रिक समितीचा अहवाल आणि प्रादेशिक केंद्राच्या विश्लेषणाचा अभ्यास करणे आणि पुढील कार्यवाहीसाठी स्थायी समितीकडे पाठविणे.

२) तंत्रिक समिती

या समितीमध्ये सदस्य देशांच्या प्रतिनिधींचा समावेश असतो. या समितीवर सार्कच्या धोरणांची अंमलबजावणी,समन्वय आणि देखरेख ही जबाबदरी असते. सभासद देशांच्यासाठी घटनेनुसार कार्ये केली जातात उदा.

१. प्रतिनिधीच्या क्षेत्रांत कार्यक्रम आणि प्रकल्पांची उभारणी करणे.
२. मुख्य प्रकल्पांची अंमलबजावणी करणे.
३. प्रकल्प कमिटीचा अहवाल स्थायी समितीला सादर करणे.

सार्कच्या तांत्रिक समितीचा संबंध १ कृषी २ पर्यावरण ३ विज्ञान आणि तंत्रज्ञान ४ दळणवळण ५ आरोग्य आणि लोकसंख्या ६ ग्रामिण विकास ७ पर्यटन इत्यादींशी असतो.

ISSN : 2319-9318
January 2019

३) घोषणापत्र

घोषणा पत्रातील प्रमुख्य मुद्दे.

१. दक्षिण आशिया एक शांतिपूर्ण व स्थिर क्षेत्र बनविणे.

२. विवाद,मतभिन्नता व संघर्ष ह्यावर शांततेच्या उपाययोजना करणे.

३. सार्वभौमिकता,समानता,क्षेत्रीय अखंडता व राष्ट्रांचे स्वातंत्र्य ह्यांच्या आधारावर समंजस शेजारी म्हणून राहणे व विकास साधणे.

४. शस्त्रास्त्रांचा वापर न करणे, इतरांच्या कारभारात हस्तक्षेप न करणे, तसेच दुसऱ्या देशांच्या भानगडीत न पडणे ह्यावर जोर देण्यात आला.

५. सार्कच्या छोटया छोटया देशांच्या विशेष समस्याबद्दल जागरुक राहणे.

४) सार्कच्या सर्वसाधारण तरतुदी (SAARC)

१. सार्कमधील देश कोणताही निर्णय एकमताने घेतात.

२. संघटनेत विवाद्य मुद्दे टाळले जातात.

५) सार्कचे व्यवस्थापन :

सार्कचे व्यवस्थापन पुढीलप्रमाणे आहे.

अ) उच्चस्तरिय यंत्रणा **(Summits):** हे या संघटनेचे सर्वोच्च अधिकार मंडळ आहे. त्यात प्रत्येक देशाचा, सभसद देशांचा समावेश आहे. हे अधिकार मंडळ हे ध्येयधोरणे ठरवितात. त्याला 'कौन्सिल' म्हणतात. प्रत्येक वर्षी आळीपाळीने हे मंडळ वार्षिक सभा घेते.

ब) सार्क सचिवालय **(SAARC Secretaria) :** १६ जुलै १९८७ रोजी सार्कचे सचिवालय काठमांडू येथे स्थापन झाले. तेथे उपक्रमांची अंमलबजावणी केली जाते. या कार्यालयात सेक्रेटरी जनरल हा प्रमुख आहे. सभासद देशांच्या नियुक्त मंत्रिपरिषदेमार्फत सेक्रेटरी जनरलची नेमणूक होते. तीन वर्षासाठी होत. १९९७ पासून हा कालावधी दोन वर्षांचा केला आहे. सचिवालयात सेक्रेटरी जनरल ७ डायरेक्टर असतात. प्रत्येक देशाचा एक डायरेक्टर आणि जनरल सर्व्हिस स्टाफ असतो. सेक्रेटरी डायरेक्टरची नेमणूक करतो. सचिवालयाच्या स्थापनेचा खर्च नेपाळ सरकारने केला. त्यापुढील खर्च प्रत्येक देशाने वाटून घेतला. भारताचा एकूण खर्चात ३२%, पाकिस्तानचा २५%, बंगलादेश, नेपाळ, श्रीलंका यांचा ११%, भूतान आणि मालदीव यांचा ५%, हिस्सा आहे.

क) मंत्रिमंडळ **(Council of Ministers) :** मंत्रिमंडळात सभासद देशांचे परराष्ट्र व्यवहार मंत्री असतातत्र ही परिषद धोरणे ठरविते. प्रगतिचा आढावा घेणे: सहकार्याची क्षेत्रे ठरविणे: ही परिषद वर्षातून दोनदा सभा घेते.

ड) स्थायी समिती **(Standing Committee) :** स्थायी समितीत सभासद देशांचे परराष्ट्रीय सचिव असतात. स्थायी समिती कार्यक्रमाचे नियोजन करणे, कार्यक्रम राबविणे ही कामे ते करत वित्तपुरवठयावर देखरेख,परस्पर सहकार्य, क्षेत्रांतर्गत प्राधान्य क्रम निश्चित करणे ही कामे

केली जातात. स्थायी समिती कार्यवाही समिती नेमू शकते. त्या आधारे योजना राबविली जाते. त्यात प्रत्येक देशाचे दोन सभासद असतात.

इ) उपक्रम समिती **(Programming Committee):** उपक्रम समिती स्थायी समितीला मदत करते त्यात उच्च अधिकारी असतात. सचिवालयाचे अंदाजपत्रक तयार करणे,कार्यक्रमांची कार्यक्रमपत्रिका तयार करणे.ही कामे या समितीकडे आहेत.

ई) तांत्रिक समिती **(Technical Committee)** : यात सर्व सभासद देशप्रतिनिधी असतात. विविध क्षेत्रांतील योजना तयार करणे आणि राबविणे. ही जबाबदारी या समितीची आहे. प्रत्येक सभासद देशाला मुळाक्षरानुसार दोन वर्षासाठभ अध्यक्षपद भूषवता येते. शेती, दळणवळण, पर्यावरण, आरोग्य, लोकसंख्या, ग्रामीण विकास, शास्त्र तंत्रज्ञान, पर्यटन आणि वाहतूक अशा बारा तांत्रिक समित्या कार्यरत आहे.

६) इतर संघटनांशी सहकार्य (Co-operation with other Organisation) : सार्क आंतरराष्ट्रीय व प्रादेशिक संघटनांच्या सहकार्यासाठी स्थापन झाले. त्यामध्ये अनेक करार केले जातात. १९९३ मध्ये व्यापार विश्लेषण आणि माहिती पद्वत याबाबत सार्क आणि अंकटाड यात समझोता करार (Memorandum of Association) संस्थापन लेख करण्यात आला.

हा पहिला करार होता. तसेच सार्क आणि ESAP (Economic and Social Commission for Asia and Pasific) यांच्यात फेब्रुवारी १९९४ मध्ये करार झाला. त्यात विकास समस्याबाबत सहकार्य करणे. त्यासाठी एकत्रित अभ्यास, परिषदा,चर्चासत्रे आयोजित करण्यावर भर दिला आहे.

सार्कने UNDP शी १९९५ मध्ये करार केला. कोलंबो प्लॅन १९९५ मध्ये झाला आणि युरोपियन समाजाशी १९९६ मध्ये करार केला.

७) सार्क निधी **(SAARC Funds)** सार्कचा निधी दोन प्रकारचा –

१. सार्क – जपान विशेष निधी **(SAARC – Japan Special Fund)** : १९९३ मध्ये जपान सरकारने वित्तपुरवठा करुन सार्कला मदत केली. हा निधी पाच लाख डॉलर्सचा आहे. त्यात दोन विभाग आहेत. पहिल्या विभागानुसार विभागांत हा निधी वापरावयाचा व दुसऱ्या विभागात जपान सरकारने सुचविलेले व्यवस्थापन केलेले उपक्रम राबवायचे आहेत.

२. दक्षिण आशिया विकास निधी **(South Asian Development Fund)** : सार्कच्या प्रादेशिक योजना निधीच्या स्थापने वेळी ५० लाख डॉलर्स भांडवल गुंतवणूक केली. त्यातच सार्क प्रादेशिक फंडनिधी स्थापन झााला. त्यातील उद्देशांनुसार उपक्रम आणि योजना राबविताना आर्थिक अडचणी येऊ नयेत म्हणून निधी उभारला आहे.

ISSN : 2319-9318
January 2019

दक्षिण आशियायी विकास निधीचे तीन प्रकारे कार्य चालते उदा.

१. योजना शोधणे आणि विकास करणे.

२. संस्थात्मक आणि मनुष्यबळ विकास योजना राबविणे.

३. सामाजिक विकास: सुविधा संबंधित विकास योजना राबविणे.

८) भारताचा सार्क देशांशी व्यापार **(India's Trade with SAARC) :** भारताने नेपाळ, बांगला देश, भूतान व श्रीलंकेबरोबर द्विपक्षीय करार केले आहेत. 'सार्क' च्या सभासद देशांत भारत भौगोलिक व आर्थिकदृष्टया प्रगत असल्याने सार्कच्या व्यापरामध्ये भारताचा वाटा सर्वाधिक आहे. भारताचा सार्क देशांशी असणारा व्यापारतोल हा सतत अनुकूल आहे. सार्क देशांशी भारताचा व्यापार प्रामुख्याने बांगलादेश, भूतान, मालदिव, नेपाळ, पाकिस्तान, श्रीलंका, अफगाणिस्थान इ. सहकारी देशांशी चांगला व्यापार चालतो.

९) व्यापार व आर्थिक सहकार्य **(Trade and Economic Co-operation) :** सार्कने सदस्य देशांमध्ये महत्त्वाचा क्षेत्रांत आर्थिक सहकार्य व व्यापार विकास हयाकरिता काही पावले उचलली. हयात सार्क अधिमानी व्यापार करार (साप्टा) सर्वात महत्वपूर्ण आहे. सार्क अधिमान्य (अधिक पसंती) व्यापार करार (साप्टा) (SAARC Preferential Trading Agreement- SAPTA) : सार्क देशांच्या अंतर्गत व्यापार सहकार्य वाढावे म्हणून ७ डिसेंबर १९९५ पासून साप्टा करार लागू करण्यात आला. आतंरक्षेत्रीय व्यापाराचा प्रसार करणारी साप्टा ही एक गठीत संस्था आहे. हा संस्थेचा उद्देश हा सार्कमधील देशांच्या व्यापारात येणारे अडथळे व्यवस्थितपणे निवारणे.

अ) सार्क अधिमान्य व्यापार कराराची **(SAPTA):** उद्दिष्टे पुढीलप्रमाणे :

१. सार्कच्या सदस्य देशांचा हळूहळू व्यापार विस्तार करणे.

२. 'सार्क' देशातील अडथळे काढून टाकणे.

३. सदस्य देशांत आर्थिक सहकार्य आणि अंतर्गत व्यापाराची स्थैर्याधिष्ठित उभारणी करणे.

**निष्कर्ष :**

१. आर्थिक विकास व सामाजिक विकास साध्य होण्यास मदत होते.

२. इतर विकसनशील देशांबरोबर सहकार्य वाढीस लागते.

३. सभासद देशांशी विविध करार केल्यामुळे व्यापार वाढीस चालना मिळते.

**संदर्भ :**

१. डॉ. एस.व्ही. ढमढेरे, भारतीय आणि जागतिक आर्थिक विकास, डायमंड पब्लिकेशन्स,पुणे.

२. डॉ. आर.के दातीर, डॉ.डी.जी.उशीर, प्रा.जी.जे. लोमटे, डॉ.एस.आर.निकम, निराली प्रकाशन, पुणे.

३. प्रा. डॉ. राजेंद्र अ.रसाळ, भारतीय आणि जागतिक आर्थिक विकास सक्सेस पब्लिकेशन्स, पुणे.

४. डॉ. मुंकुंद महाजन, भारतीय आणि जागतिक आर्थिक विकास,निराली प्रकाशन, पुणे.